राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६६०९/२०२६

श्रीमती. वासंती कुरूप उदय
जनरल स्टोअर, मालाड (प),
मुंबई-४०० ०९५.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051.

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६</u>

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१३.०९.२०२१	२७.०९.२०२१	३१.१०.२०२१	०७.१२.२०२१

अपिलार्थीनी दिनांक १३.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या मूळ जोडपत्राच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, झोपडपट्टी सुधारणा, गृहनिर्माण विभाग येथे अर्जदार यांची मागितलेली माहिती ही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी **कलम ६ (३) (२)** अन्वये दिनांक २७/०९/२०२१ रोजी अर्जदारांचा अर्ज जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे यांच्याकडे आवश्यक कार्यवाही करीता हस्तांतरित केला असल्याचे आढळून येते.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींचा अर्ज हस्तांतरित केल्यामुळे अपिलार्थीनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी माहिती देणे क्रमप्राप्त होते. तथापि, कुठलीच माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीनी प्रथम अपिल अर्ज हा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्याकडे दाखल केला.

दिनांक ०७/१२/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत संबंधित अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीनी त्यांना हव्या असलेल्या माहिती बाबत वस्तूस्थिती निदर्शनात आणली असता त्यांच्याकडे दुकानाचा फोटो पास असताना देखील त्यांचे परिशिष्ट-दोन मध्ये नावाचा समावेश केला नाही व त्यांना हक्कापासून वंचित

ठेवले असल्याचे दिसून आले. फोटो पास व परिशिष्ट-दोन मध्ये नावाचा समावेश करण्याचा विषय उपजिल्हाधिकारी (अतिक्रमणे / निष्कासने) यांच्याशी संबंधित असून सदर विषय गृहनिर्माण विभागाच्या झोपनि-२ कार्यासनाच्या अखत्यारीत असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (झोपडपट्टी सुधारणा-१) यांनी अपिलार्थीना माहिती मिळण्यासाठी व रास्त न्याय मिळण्याकरीता झोपनि-२ यांच्याशी संपर्क साधून दिलेला असून याच मुद्यावर अपील अर्ज निकाली काढण्यात आला असल्याचे आढळून येते. तथापि, अपिलार्थीनी प्रत्यक्षात माहिती मिळाली नाही. तसेच त्यांच्या तक्रारीचे निराकरण ही झाले नसल्याचे आढळून येते व त्याविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला सादर केलेल्या कागदपत्रांच्या अवलोकनावरून आढळून येते.

प्रस्तुत प्रकरणी अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे फोटो पास व परिशिष्ट-२ या संदर्भात उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण व निष्कासन तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी यासंदर्भात अपिलार्थीना माहिती प्रदान करणे अपेक्षित असताना असे झाले असल्याचे आढळून येत नाही. ही बाब लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ जोडपत्राच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तसेच अपिलार्थीनी मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडे केलेली तक्रार, गृहनिर्माण विभागाकडे सादर केलेले निवेदन जे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना अग्रेषित करण्यात आले होते त्यावर करण्यात आलेली प्रक्रिया याबाबतीत **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २ (च)** प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती तसेच घेतलेला निर्णय, पारित केलेले आदेश या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली नस्ती, त्यातील टिप्पणी, शेरे व नोंद या सर्वांसह अपिलार्थीना वरील आदेश प्राप्त होताच १५ दिवसात विनामूल्य देण्याच्या निर्देशासह तसेच या संदर्भात अपिलार्थी या ज्येष्ठ नागरिक असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ५ (३)** प्रमाणे त्यांना माहिती अधिकाऱ्यांनी माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना वाजवी सहाय्य करील या तरतुदीनुसार अपिलार्थीना त्यांचा मूळ तक्रार अर्ज त्या अनुषंगाने दाखल केलेले **जोडपत्र अ** याबाबत वाजवी मदत करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६६०९/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : ०५.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**